जाहिरात क्र. १/१६४, दि. ०६/०६/२०१८

# जाहिरात

## शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका

## कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे - 5

शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका संचलित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी तात्पुरत्या स्वरूपात एकवट मानधनावर रक्कम रु. 10000/- दरमहा करार पद्धतीने सहा महिने मुदतीसाठी हंगामी शिक्षकांची निवड, प्रतीक्षा यादी शैक्षणिक, व्यावसायिक पात्रतेच्या गुणानुक्रमे करण्यात येणार आहे. खाली नमूद केलेली शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात वैयक्तिक माहितीचा अर्ज, प्रमाणपत्रांच्या व गुणपत्रकांच्या प्रमाणित छायांकित प्रती जोडून अर्ज शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे - 5 येथे सकाळी 11 ते 2.00 या वेळेत हस्तपोच स्वीकारण्यात येतील. जाहिरात दिनांकापासून 7 दिवसांपर्यंत आलेल्या पूर्ण अर्जांचा विचार केला जाईल. मुदतीनंतर व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच पोस्टाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता - प्राधान्यक्रम**

1. इयत्ता 1 ली ते 12 वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.
2. इयत्ता 10 वीपर्यंत इंग्रजी आणि 12 वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.
3. इयत्ता 1 ली ते 10 वी मराठी अथवा इतर माध्यमातून व 12 वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण
4. इयत्ता 1 ली ते 12 वी मराठी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

अ) वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना इंग्रजी माध्यमातून टी.ई.टी. व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील. इंग्रजी माध्यमातून टी.ई.टी. व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. तद्नंतर इतर माध्यम टी.ई.टी. व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ब) तथापि टी.ई.टी. उमेदवार उपलब्ध न झाल्यास वरील 1 ते 4 च्या प्राधान्य क्रमांकानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. अटी, शर्ती शिथिल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

**एकूण पदे - 238**

| अजा | अज | वि.जा.अ. | भ ज ब | भ ज क | भ ज ड | वि मा प्र | इ मा व | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 31 | 17 | 7 | 6 | 8 | 5 | 5 | 45 | 114 | 238 |

**गुणदान तक्ता -**

| तपशील | १० वी (गुण) | १२ वी (गुण) | डी.एड. (गुण) | टी.ई.टी. (गुण) | अभियोग्यता चाचणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| भारांश | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 50 |

वरील आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारांनुसार जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**अटी व शर्ती -**

- वयोमर्यादा दि. 31/05/18 रोजी सर्वसाधारण व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनुक्रमे कमाल 38 वर्षे व 43 वर्षेपर्यंत राहील.
- आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता नमूद केल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. गुणवत्ताधारक अर्जदारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. अर्ज करताना उमेदवाराने जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची अथवा शालांत परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- अर्जासोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, जातीचा दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. सत्यप्रती जोडले नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- सदरचे पद हे तात्पुरते ६ महिने करार पद्धतीचे आहे. या पदावर उमेदवारास शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.
- शासकीय व अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचे व प्रक्रियेत बदल करण्याचे

www.fjs.co.in

अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

- अर्जदाराने आपले अर्ज शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपाने जाहिरातीमध्ये निश्चित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.
- अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक नसल्याचे आढळून आल्यास व उमेदवार गैरवर्तन/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
- उमेदवारांनी मोबाईल क्रमांक / ई-मेल आयडी देणे अनिवार्य आहे.
- वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणेकामी मोबाईल, एसएमएसचा वापर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

**(शिवाजी दौंडकर)**
**प्रशासकीय अधिकारी**
**शिक्षण विभाग (प्राथ.) पुणे मनपा**

## अर्जाचा नमुना

अर्जदाराचा अलीकडे काढलेला आयकार्ड आकाराचा फोटो स्वयंसाक्षांकित

**मा. प्रशासकीय अधिकारी**
**प्राथमिक शिक्षण विभाग,**
**पुणे महानगरपालिका.**

**यांजकडे सादर..**

**विषय : शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळांमध्ये सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाकरिता 6 महिने कालावधीसाठी एकवट मानधनावर दरमहा र. रु. 10000/- वर करार पद्धतीने हंगामी शिक्षक पदासाठी अर्ज**

महोदय,

1. अर्जदाराचे नाव : (मराठी)------------------------------------------------
   इंग्रजी : (कॅपिटलमध्ये)------------------------------------------------
2. कायम राहण्याचा पत्ता ------------------------------------------------
3. दूरध्वनी / मोबाईल नंबर - ------------------------------(अनिवार्य)
4. ई-मेल आयडी ------------------------------------------------
5. जात ------------------------------------प्रवर्ग------------------------------
6. जन्मतारीख : DD/MM/YYYY संपूर्ण
7 वय (दिनांक 30/04/2018 रोजी) वर्ष------- महिने ----------

| अ. क्र. | शैक्षणिक / व्यावसायिक पात्रता | माध्यम | बोर्ड/ राज्य | उत्तीर्ण दिनांक | किती पैकी | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एस.एस.सी. | | | | | | |
| 2 | एच.एस.सी. | | | | | | |
| 3 | डी.एड. / डीटीएड | | | | | | |
| 4 | टीईटी | | | | | | |
| 5 | अभियोग्यता चाचणी | | | | | | |
| 6 | इतर पदवी, पदविका | | | | | | |

अर्जासोबत माझ्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, गुणपत्रके व इतर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडलेल्या आहेत. माझी सर्व माहिती ही सत्य व अचूक आहे. नियुक्तीसाठी जाहिरातीमधील विहीत अटी व शर्ती मला मान्य आहे. तरी माझी एकवट मानधनावर करार पद्धतीने सन 2018-19 या शैक्षणिक वर्षासाठी 6 महिने कालावधीसाठी हंगामी शिक्षक या पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

**आपला/आपली विश्वासू**
**अर्जदाराची सही**
**(अर्जदाराचे संपूर्ण नाव)**